पर्यायी सौंदर्यशास्त्राच्या दिशेने---

(भालचंद्र नेमाडे आणि शरद पाटील यांचा साहित्यविचार)

गेल्या तीस-पस्तीस वर्षांच्या काळात मराठी साहित्यामध्ये एक महत्त्वपूर्ण परिवर्तन घडून आलेले आहे. यापूर्वी अर्वाचीन साहित्य किंवा नवसाहित्य या रूपाने जी परिवर्तने मराठी साहित्यात घडून आली त्यापेक्षा या परिवर्तनाचे स्वरूप मूलतः वेगळे आहे. हा बदल केवळ वाङ्मयीन प्रभावातून झालेला किंवा केवळ वाङ्मयीन स्वरूपाचा नसून या परिवर्तनाला एक व्यापक सामाजिक संदर्भ आहे. मराठी समाजाच्या विविध स्तरांतून व पोटसमूहातून आलेले लोक साठोत्तरी काळात मोठ्या प्रमाणावर साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी झालेले आहेत. त्यामुळे मराठी साहित्यविश्वातील एकवर्गीय प्रभाव कमी होऊन प्रस्थापित साहित्याला समान्तर असे साहित्यप्रवाह आणि चळवळी या काळात निर्माण झाल्या. या नव्या प्रेरणा-प्रवृत्तीच्या साहित्याचे आकलन व मूल्यमापन करण्यासाठी मराठीतले प्रस्थापित सौंदर्यशास्त्र/साहित्यशास्त्र अपुरे पडत असल्याने हे प्रस्थापित सौंदर्यशास्त्र नाकारून एक वेगळे पर्यायी सौंदर्यशास्त्र निर्माण केले गेले पाहिजे असा विचार अलिकडे सातत्याने मांडला जाऊ लागलेला आहे. पण या संदर्भात एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, ती अशी की केवळ एखाद्या नव्या साहित्यप्रवाहाचे आकलन करून घेण्यासाठीच वेगळ्या सौंदर्यशास्त्राची आवश्यकता आहे, असे नसून प्रस्थापित सौंदर्यशास्त्राने निर्माण केलेले कानून एकूण साहित्याच्याच आकलनासाठी अपुरे आहेत, हे प्रस्थापित सौंदयशास्त्र एकवर्गीय जाणीवेच्या मर्यादित अडकेलं आहे, म्हणूनच एका पर्यायी सौंदर्यशास्त्राची गरज आहे. साहित्याकडे पाहण्याचं एक पर्यायी परिप्रेक्ष्य अशा सौंदर्यशास्त्रातून अभिव्यक्त करता येईल. अशा नव्या सौंदर्यशास्त्राबद्दल मराठीत अलिकडे बरीच चर्चा झालेली आहे, पण हे पर्यायी सौंदर्यशास्त्र परिपूर्ण स्वरूपात उभे राहिले आहे, असा आज दावा करता येणार नाही. मात्र या नव्या सौंदर्यशास्त्राच्या उभारणीसाठी पायाभूत ठरेल अशा सैद्धान्तिक भूमिकेची व विचारांची मांडणी भालचंद्र नेमाडे यांच्या 'टीकास्वयंवर' आणि शरद पाटील यांच्या 'अब्राह्मणी साहित्यांचे सौंदर्यशास्त्र ' या दोन महत्त्वाच्या ग्रंथांतून झालेले आहे. हे दोन्ही ग्रंथ आपापल्या परीने वेगळे असले तरी साहित्य आणि सौंदर्य यांच्या

परामर्श, खंड १८, अंक १, मे १९९६.

विचाराबाबत एक पर्यायी परिप्रक्ष्य मराठीमध्ये प्रथमच अत्यंत ठळकपणे या दोन्ही ग्रंथांतून व्यक्त झालेलं आहे.

वेगळ्या सौंदर्यशास्त्रनिर्मितीचा विचार शरद पाटील यांच्या लेखनातून जसा जाणीवपूर्वक व्यक्त झालेला आहे, तसा तो नेमाडे यांच्या 'टीकास्वयंवर' मध्ये दिसत नाही. पण प्रस्थापित सौंदर्यविचाराच्या मर्यादा स्पष्ट करीत जाणारे नेमाडे यांचे लेखन पर्यायी सौंदर्यशास्त्राला आधारभूत ठरेल अशी तात्त्विक भूमिका मांडणारे आहे. शरद पाटील आणि नेमाडे या दोघांचेही लेखन सौंदर्यशास्त्रीय चर्चेची रूढ पद्धती अनुसरणारे नाही. म्हणजे सौंदर्यशास्त्रीय संकल्पनांचे तार्किक विश्लेषण जसे ते करीत नाहीत त्याचप्रमाणे 'सुंदर' या पदाचे स्वरूप काय? सौंदर्य विधानाचे स्वरूप काय? अशा प्रश्नांचीही ते चर्चा करीत नाहीत. या दोघांचेही सौंदर्यविषयक/साहित्यविषयक विवेचन अमूर्त अशा तार्किक चर्चेऐवजी प्रत्यक्ष साहित्यव्यवहार आणि वाङ्मयीन संस्कृती यांच्या आकलनावर आधारलेले आहे. हे लेखन सौंदर्यशास्त्रीय चर्चेची रूढ पद्धती नाकारणारे असले तरी प्रस्थापित विचाराला छेद देणारी भूमिका त्यातून व्यक्त होत असल्याने मराठीतील सौंदर्यशास्त्रीय विचारात ते ऐतिहासिक महत्त्वाचे ठरणारे आहे. म्हणून नेमाडे व शरद पाटील यांचे अनुक्रमे 'टीकास्वयंवर' आणि 'अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र' हे दोन ग्रंथ म्हणजे मराठीतील पर्यायी सौंदर्यशास्त्राच्या रचनेचा प्रारंभ होय, असे म्हणावे लागेल.

पर्यायी सौंदर्यशास्त्राच्या चर्चेला सुरवात करताना प्रथम एक प्रश्न सोडवावा लागतो तो असा की पर्यायी असे काही सौंदर्यशास्त्र तत्त्वतः शक्य आहे का? किंवा एकाहून अधिक वेगवेगळी सौंदर्यशास्त्रे असू शकतात का? या प्रश्नाबाबत एक भूमिका अशी घेतली जाते की सौंदर्यशास्त्र हे शास्त्र म्हणून सार्वत्रिक (युनिव्हर्सल) स्वरूपाचेच असल्याने एकापेक्षा अधिक सौंदर्यशास्त्रे किंवा पर्यायी सौंदर्यशास्त्र ही कल्पनाच तात्त्विकदृष्ट्या असंभाव्य आहे. सौंदर्यमूल्ये आणि एकूणच संकल्पना या सार्वत्रिक असतात, अशा गृहीताकावर ही भूमिका आधारलेली आहे. या भूमिकेचे अधिक स्पष्ट असे तात्त्विक समर्थन रा.भा.पाटणकर यांच्या 'सौंदर्यमीमांसा' या ग्रंथात पहावयास मिळते. (या संदर्भात विशेषतः त्यांनी केलेले कांट आणि सार्त्र यांच्या भूमिकांचे टीकात्मक परीक्षण पहावे.) रा.भा.पाटणकर आणि मिलिंद मालशे यांनी मुंबई विद्यापीठाच्या 'बॉम्बे रिव्ह्यू' या अर्धवार्षिकात संयुक्तपणे लिहलेल्या 'कॅन देअर बी ए ॲस्थेटिक थिअरी?' या शीर्षकाच्या लेखातही अशाच सार्वत्रिकतावादी भूमिकेचे समर्थन केलेले आहे. कलानिर्मितीमागे असणारी सौंदर्याची संकल्पनात्मक चौकट देशकालसंस्कृतीपरत्वे बदलत असते हे मान्य करूनही या संस्कृतीसापेक्ष भेदांकडे दुर्लक्ष करून पाटणकर व मालशे यांनी वरील लेखात सार्वत्रिक सौंदर्यशास्त्राचा पुरस्कार केलेला आहे, आणि सार्वत्रिकतेची भाषा हा पाश्चात्यांच्या सांस्कृतिक साम्राज्यवादाचा भाग आहे असे मानणाऱ्या भूमिकेचे खंडन करून पर्यायी किंवा विरोधी सौंदर्यशास्त्राची संकल्पना (ॲस्थेटिक ऑफ आपोझिशन) त्याज्य ठरविलेली आहे. पाटणकर/मालशे यांच्याप्रमाणे गं.बा.सरदार, विद्याधर पुंडलिक यांनीही भालचंद्र नेमाडे यांच्या भूमिकेचा प्रतिवाद करताना 'मूल्ये ही

सार्वत्रिकच असतात' या मताचे आग्रही प्रतिपादन केलेले आहे. मराठीत आजवर जे सौंदर्यशास्त्रीय सिद्धांत मांडले गेलेले आहेत, त्यांच्या मागे सौंदर्यमूल्यांच्या सार्वत्रिकतेची हीच भूमिका अध्याहृत आहे.

पण वस्तुतः ही सार्वत्रिकतावादी किंवा एकात्मवादी भूमिका एका मर्यादेपलिकडे मान्य करता येणार नाही. सगळ्या सौंदर्यसंकल्पनांमध्ये देशकालसमाजसापेक्ष असा जो भेद असतो. तो मूल्यात्मक दृष्ट्या अधिक महत्त्वाचा असतो हे विसरून चालणार नाही. वस्तुनिष्ठ आणि सार्वत्रिक अशा नियमांवर आधारलेल्या प्राकृतिक विज्ञानांमध्येही संपूर्ण वस्तुनिष्ठता शक्य नाही असे आज मानले जाऊ लागले आहे. अशा वेळी कला आणि साहित्यव्यवहारांसारख्या क्षेत्रात तर वस्तुनिष्ठ व सार्वत्रिक नियमांचा आग्रह धरणे अगदीच योग्य होणार नाही. म्हणून मानवनिर्मित मूल्य-व्यवहारांचा विचार करताना सार्वत्रिकतावादी भूमिकेऐवजी सापेक्षतावादी भूमिका स्वीकारणे हेच स्वाभाविक ठरू शकेल. सापेक्षतावादी भूमिकेनुसार सौंदर्यमूल्ये आणि जीवनमूल्ये ही स्थलकालसमाजसापेक्ष असतात असे मानले जाते. भालचंद्र नेमाडे यांचे 'टीका स्वयंवर' मधील सगळे सिद्धांतन या मूल्यसापेक्षतावादाच्या भूमिकेतच आधारलेले आहे. 'मूल्ये ही देशकालातीत नसून ती त्या त्या समूहाची व संस्कृतिसापेक्ष असतात' हे त्यांच्या साहित्यविचारांमागील मुख्य सूत्र आहे. शरद पाटील यांनीही सौंदर्याच्या एकात्म किंवा सार्वत्रिक संकल्पनेला विरोध करून सौंदर्याच्या एकात्मसौंदर्य कल्पना ह्या गण, वंश, जात यानुसार वेगळ्या असतात, त्या गणवंशजातवर्गातीत नसतात असे मानलेले आहे. (शरद पाटील, पृ. १८७) अशा प्रकारची सापेक्षतावादी भूमिका पर्यायी सौंदर्यशास्त्राच्या चर्चेत मूलभूत महत्त्वाची ठरते कारण ती स्वीकारली तरच पर्यायी सौंदर्यशास्त्राची संकल्पना तत्त्वतः संभवनीय ठरते. परंतु नेमाडे आणि शरद पाटील यांचा अपवाद वगळता मराठीत वेगळे सौंदर्यशास्त्र पाहिजे असे म्हणणाऱ्यांपैकी कोणीच या पायाभूत भूमिकेचा पुरेसा विचार केलेला दिसत नाही.

सापेक्षतावादी भूमिकेच्या संदर्भातही असा प्रश्न उपस्थित होतो की मूल्यांची सार्वत्रिकता नाकारणे तरी कितपत योग्य आहे? कारण मूल्यसापेक्षतेचा विचार टोकाला नेला की आपण अनन्यसाधारणत्वाच्या सिद्धांताकडे येऊन पोहोचतो आणि प्रत्येक व्यक्तिपरत्वे, कलाकृतीपरत्वे वेगवेगळी मूल्ये मानण्याची आपत्ती आपणास स्वीकारावी लागते. सौंदर्यशास्त्रीय चर्चेत अशा प्रकारची अनन्यसाधारणवादी भूमिकाही मांडली गेलेली आहे. प्रत्येक सौंदर्यवस्तू अनन्यसाधारण असून सौंदर्यानुभव व्यक्तिपरत्वे वेगळा असतो, त्यामुळे सौंदर्याचे सार्वत्रिक नियम सांगता येत नाहीत असे या भूमिकेनुसार मानले जाते. ज्ञानमीमांसेमध्ये अनुभववाद मानणारे लोक साधारणपणे वरील प्रकारची भूमिका घेत असतात. परंतु सौंदर्यशास्त्र ही संकल्पनाच असंभाव्य ठरविणारी ही अनन्यसाधारणवादी भूमिका स्वीकारार्ह ठरत नाही. सापेक्षतावाद स्वीकारणे म्हणजे अशी एकांगी अनन्यसाधारणवादी भूमिका स्वीकारणे नव्हे. म्हणून पर्यायी सौंदर्यशास्त्राचा विचार करताना एका टोकाची बाह्यार्थवादी (रीॲलिस्ट) भूमिका आणि

दुसरीकडे टोकाची अनुभववादी (आयडियालिस्ट) अशा दोन्ही भूमिका टाळाव्या लागतात आणि वस्तुसंबोध हा जरी व्यक्तिसापेक्ष असला तरी व्यक्तीचा हा अनुभव हा वस्तूच्या प्राकृतिक रूपाने किंवा बाह्यार्थाने नियंत्रित झालेला असतो असा मध्यममार्गी विचार स्वीकारणे जास्त सयुक्तिक ठरू शकते. पर्यायी सौंदर्यशास्त्राला आधार म्हणून जो सापेक्षतावाद स्वीकारायचा तो अशा मध्यममार्गी भूमिकेवर उभारलेला असला पाहिजे. असा मध्यममार्ग स्वीकारायचे ठरविले की मग आपण घटितार्थशास्त्रीय ज्ञान-मीमांसेच्या जवळपास येऊ लागतो. शरद पाटील यांनी अब्राह्मणी सौंदर्यशास्त्राचा दार्शनिक आधार म्हणून दिग्नागाच्या ज्या प्रमाणशास्त्राचा पुरस्कार केलेला आहे, तेच दिग्नागाचे प्रमाणशास्त्र हुसेर्लच्या घटितार्थशास्त्राच्या आणि सार्त्रच्या अस्तित्ववादी सौंदर्यशास्त्राच्या रूपाने विकसित झालेले आहे, असे त्यांनी दाखवून दिलेले आहे. शरद पाटलांच्या एकूण विवेचनाचा सारांश असा आहे की नव्या सौंदर्यशास्त्राच्या उभारणीसाठी केवळ बाह्यार्थवादी किंवा केवळ अनुभववादी भूमिका उपयोगी पडणार नाही, तर या दोन्हीपेक्षा वेगळे प्रमाणशास्त्र स्वीकारले पाहिजे. असे प्रमाणशास्त्र स्वीकारले की सापेक्षतावादाला अनन्यसाधारणवादी भूमिकेच्या टोकापर्यंत नेण्याचा एकांगीपणा आपण टाळू शकतो.

भालचंद्र नेमाडे यांनी दार्शनिक चर्चा फारशी केलेली नाही. पण वस्तुसंबोधाविषयी नेमाडे ही अशीच मध्यममार्गी भूमिका स्वीकारतात असे त्यांच्या विवेचनावरून दिसून येते. एके ठिकाणी ते म्हणतात ''साहित्यकृती ज्या माध्यमातून व्यक्त होते ते भाषा हे माध्यम स्थलकालसीमित असल्याने व सामाजिक संस्था म्हणूनच भाषा व्यक्तिला उपलब्ध होत असल्याने व्यक्तीच्या आकलनशक्तीवर तिचा ताबा असतो. त्यात समाजाने ठरवून दिलेल्या अर्थाच्या संकल्पना-संस्था लेखकाला बंधनकारक असतात. व्यक्तीलाच केंद्रीय प्राधान्य देऊन वास्तवाचे अनिर्बंध चित्रण भाषेतून शक्य नसते'' (टीकास्वयंवर पृ. १९८) व्यक्तीचे आकलन बाह्य वास्तवाने नियंत्रित होत असते अशी नेमाडे यांची भूमिका असल्याने आपल्या एकूण विवेचनात ते सापेक्षतावाद आणि वास्तववाद यांची सांगड घालू शकतात.

दार्शनिक मीमांसा थोडीशी बाजूला ठेवली तरी व्यवहारात्मक पातळीवरही सापेक्षतावादाचे समर्थन करता येते. सार्वत्रिकतेच्या नावाखाली एका अधिसत्तावादी वर्गाची मूल्ये आणि प्रमाणके अन्य वर्गांवर, समूहांवर लादण्याचा प्रयत्न दिसून येतो. इतर समूहांची स्वायत्तता, मूल्ये आणि व्यवस्था यांना नाकारून एक प्रकारची कृतक एकात्मता सोयिस्करपणे निर्माण करण्यासाठी विश्वात्मकतेचे किंवा सार्वत्रिकतावादाचे तत्त्वज्ञान पुढे केले जाते. अशा वेळी अन्य समूहांना आपली स्वायतत्ता टिकविण्यासाठी, आपली प्रमाणकेही तेवढीच महत्त्वाची आहेत हे सिद्ध करण्यासाठी या तथाकथित सार्वत्रिकतावादाला विरोध करून मूल्यसापेक्षतेची भूमिका स्वीकारणे आवश्यक ठरते. म्हणूनच प्रस्थापित वाङमयव्यवस्थेच्या विरोधात उभे राहणाऱ्या पर्यायी सौंदर्यशास्त्राला सापेक्षातावादाचा आधार घ्यावा लागतो. नेमाडे आणि पाटील यांनी तेच केलेले आहे असे दिसून येते.

मराठीत आजवर मांडल्या गेलेल्या बहुतांशी सौंदर्यशास्त्रीय सिद्धांतांचा गाभा चैतन्यवादीच असल्याचे दिसते. निदान अशा प्रकारच्या सिद्धांतांना अधिक प्रतिष्ठा मिळालेली आहे, असे दिसते. न.चिं.केळकर, बा.सी.मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये, माधव आचवल, वा.ल.कुलकर्णी, वसंत दावतर या समीक्षकांनी केलेली साहित्य/ सौंदर्यमीमांसा कोणत्या ना कोणत्या प्रकारे चैतन्यवादाशीच निगडित असल्याचे दिसुन येते. मर्ढेकर हे स्वतःला 'रीॲलिस्ट' म्हणवून घेत असले तरी सौंदर्य हे वस्तुनिष्ठ असते या एकाच मुद्द्यापुरती त्यांची भूमिका रीॲलीस्ट असून मर्ढेकरांची एकूण सौंदर्यमीमांसा कांटच्या विश्वचैतन्यवादी परंपरेतच बसणारी आहे, हे रा.भा. पाटणकर यांनी दाखवून दिलेलेच आहे. न.चि.केळकरांसारखे समीक्षक जीवात्मा, परमात्मा, समाधी अशा भाषेत साहित्य-विवेचन करतात तर साहित्य-कृतीतून चैतन्यपूर्ण भावानुभव व्यक्त होतो असे वा.ल.कुलकर्णी म्हणतात. कलाकृती हा वैश्विक संज्ञाशक्तीचा किंवा आदिशक्ती ऊर्जेचा आविष्कार असतो असे प्रभाकर पाध्ये यांना वाटते. इतरही अनेक समीक्षक सजीव, चैतन्यपूर्ण किंवा अर्थपूर्ण आकृतिबंध अशा परिभाषेत साहित्यकृतीचे वर्णन करतात. या चैतन्यवादी भूमिकेत कलानुभव हा वास्तव अनुभवापेक्षा वेगळ्या जातीचा अनुभव असतो असे आग्रहाने सांगितले जाते. कलाकृतीची वास्तवापासून फारकत करून तिच्या स्वायत्ततेचा पुरस्कार करण्यासाठी चैतन्यवादी भूमिका सोयीची ठरते. स्वायत्ततेच्या नावाखाली प्रत्यक्ष समाजवास्तव टाळूनच साहित्यकृतीचा विचार करणे योग्य आहे असे मानले जाते आणि सामाजिक आशयाच्या दृष्टीने पोकळ अशा साहित्यकृतींना ही श्रेष्ठ ठरविता येण्याची सोय केली जाते. कलाकृतीच्या समाजनिरपेक्षतेचा पुरस्कार करणाऱ्या या स्वायत्तवादी किंवा कलावादी भूमिकेला विशेषतः मर्ढेकरांनंतरच्या काळात अवास्तव महत्त्व दिले गेले. त्यामुळे सौंदर्यशास्त्रीय प्रमाणकांची व्यवस्था अत्यंत चुकीच्या दिशेने उभारली गेली. किंबहुना असेही म्हणता येईल की प्रस्थापित वर्गाने निर्माण केलेल्या साहित्याचेच समर्थन करू शकेल अशीच मूल्यव्यवस्था मराठीतील प्रस्थापित सौंदर्यशास्त्राने उभी केली.

म्हणून प्रस्थापित सौंदर्याशास्त्राला पर्यायी म्हणून उभे राहू पहाणारे सौंदर्यशास्त्र स्वायत्ततावादाच्या किंवा तथाकथित कलावादाच्या विरोधी असणे हे स्वाभाविकच ठरते. भालचंद्र नेमाडे आणि शरद पाटील यांच्या विवेचनात या स्वायत्तावादी भूमिकेला ठामपणे नकार दिला गेले असून साहित्याची निर्मिती, आस्वाद आणि तद्विषयक सिद्धांतन या प्रक्रियेत अनुस्यूत असणाऱ्या सामाजिकतेला त्यांच्या विवेचनात केंद्रस्थान मिळालेले आहे. ''साहित्यव्यवस्थेचा संपूर्ण समाजरचनेशी संघटनात्मक संबंध असतो'' असे सांगून नेमाडे म्हणतात ''भाषेचा अन्यत्र वापर करणाऱ्या इतर सर्व सामाजिक व्यवहारांशी वाङ्मयीन संस्कृतीचा अंगचाच संबंध असतो. संस्कृतीचे प्रत्येक अंग एकमेकांशी आणि शेवटी एकूण सांस्कृतिक वातावरणाशी संबंधित असते. ग्रंथकार हे सांस्कृतिक आवरणातूनच आपल्या कलेला पोषक द्रव्ये घेत असतात, त्यामुळे त्यांच्या ग्रंथनिर्मितीवर एकूण सांस्कृतीक वातावरणाचा ठसा विविध शैलीप्रकारांनी उमटत असतो.'' (टीका स्वयंवर पृ.६१). येथे नेमाडे साहित्यव्यवहाराचा

सामाजिक व्यवहाराशी अंगभूत संबंध असतो याचा निर्देश करतात, एवढेच नव्हे तर कोणत्याही स्वायत्ता संस्कृतीत लेखकाच्या सामाजिक आवरणानुसारच साहित्यकृतीच्या संरचनाही आकार घेत असतात असे ते प्रतिपादन करतात. पर्यायी सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने हा मुद्दा कळीचा ठरावा अशा महत्वाचा आहे. शरद पाटील यांचे साहित्यविषयक सर्व विवेचनही साहित्य आणि सामाजिकता यांचे अंगभूत संबंध मानूनच झालेले आहे. साहित्यकृतीचे आकलन ते सामाजिक संदर्भातच करतात. कलाकृतीचे संभवगर्भ घटकगुण कलावंताच्या अप्रत्यक्ष जाणिवेतूनच साकार होत असतात आणि कलावंताची ही अप्रत्यक्ष जाणीव वर्ग, जात अशा सामाजिक संदर्भाशी निगिडित असते. म्हणून कलाकृतीचा खरा आस्वाद सामाजिक संदर्भांच्या आकलनाशिवाय घेता येत नाही अशी शरद पाटील यांची भूमिका आहे. (शरद पाटील, पृ. ६५). अशा प्रकारे नेमाडे आणि पाटील दोघेही सौंदर्यनिर्मितीची प्रक्रिया विशिष्ट सामाजिक सांस्कृतिक न संदर्भात घडणारी प्रक्रिया आहे, असे मानत असल्यामुळे त्यांच्या विवेचनात सामाजिक -सांस्कृतिक मूल्य संकल्पना आणि सौंदर्य संकल्पना यांच्यातील भेदरेषा पुसट झालेल्या आहेत.

स्वायत्तवादी भूमिकेच्या मर्यादा दाखवून कलाकृती आणि समाज यांच्या संबंधाचा विचार मराठीत यापूर्वीही झालेला आहे. हा विचार प्रामुख्याने मार्क्सवादी समीक्षकांनी केलेला आहे. परंतु साहित्य आणि समाज यांच्या संबंधाबद्दलचे त्यांचे विवेचन बऱ्याच अंशी अमूर्त पातळीवरच राहिलेले असून भारतीय समाजाचे वर्णजातियुक्त वास्तव आणि त्याचा कलाव्यवहारावर होणारा परिणाम याचे भान मात्र मार्क्सवाद्यांनी केलेल्या साहित्यमीमांसेतून व्यक्त होत नाही. 'मार्क्सवादातील वर्गीय दृष्टी मर्मग्राही असली तरी भारतीय मार्क्सवाद्यांनी ती भारतीय साहित्य व समाजाला जशीच्या तशी लावायचा प्रयत्न केला आणि जातींचा संदर्भ निषिद्ध मानला. यामुळे मराठीतील मार्क्सवादी सौंदर्यमीमांसा अवरुद्ध होऊन उच्चवर्णीय साहित्यपरंपरेची नाळ ती तोडू शकली नाही' अशी शरद पाटील यांनी मराठीतल्या मार्क्सवादी साहित्यविचाराची चिकित्सा केलेली आहे (शरद पाटील, पृ. ५४-५५) एतदेशीय समाजवास्तवाचे आणि साहित्याचे वंशवर्णजातियुक्त अशा स्वरूपात केलेले आकलन हा नेमाडे आणि शरद पाटील यांच्या साहित्य विवेचनाचा महत्वाचा आधार आहे. लेखकाच्या जाणिवेचा किंवा त्याच्या 'वर्ल्ड व्ह्यू' चा विचार या दोघांनीही केवळ वर्गीय संदर्भात न करता सामाजिक समूह-पोटसमूह, संस्कृती- पोटसंस्कृती किंवा वंशजातिसमूह अशा संदर्भात केलेला आहे. त्यामुळे सौंदर्याच्या उच्चवर्णीय संकल्पना आणि उच्चवर्णियेतर समूहांमध्ये विकसित झालेल्या सौंदर्यसंकल्पना असा भेद नेमाडे आणि पाटील यांच्या विवेचनात स्पष्टपणे केलेला दिसतो. प्रस्थापित सौंदर्यशास्त्रातून सार्वत्रिक म्हणून मांडल्या गेलेल्या सौंदर्यकल्पना या वस्तुतः सार्वत्रिक नसून एकाच समूहाच्या त्या बंदिस्त सौंदर्यकल्पना आहेत. याचा निर्देश करून नेमाडे व पाटील व्यापक सामाजिकऐतिहासिक परिप्रेक्ष्यात उच्चवर्णीय सौंदर्यकल्पनांच्या मर्यादा स्पष्ट करतात. कलाव्यवहारात अनुस्यूत असणाऱ्या सामाजिकतेचा असा विचार मराठीतील यापूर्वीच्या सौंदर्यशास्त्रीय चर्चेत झालेला नाही. या दृष्टीने नेमाडे व पाटील यांनी

केलेली साहित्य-मीमांसा सामाजिक-सौंदर्यशास्त्रीय (Social aesthetic) मीमांसा आहे, असे म्हणावे लागते. म्हणूनच 'साहित्य हे एका विशिष्ट समाजाच्या रचनेशी व परंरपरेशी निगडित असलेलं तत्त्व आहे असा सोशल-अँथ्रॉपॉलॉजिकल ॲप्रोच स्वीकारल्याशिवाय साहित्यवाद शक्यच होत नाही' असा निष्कर्ष नेमाडे यांनी काढलेला असून 'मराठी अभिरुची ही जाती, धर्म, व्यवसाय, लिंग इ. सामाजिक तत्वांनीच साहित्याचा विचार करणारी आहे असे निरीक्षणही त्यांनी नोंदवलेले आहे. (टीकास्वयंवर, पृ. १५८)

सामाजिक-सांस्कृतिक व्यवहारातील मूल्य संकल्पना आणि साहित्यादि व्यवहारातील सौंदर्यकल्पना यात फारसे अंतर नाही असे मानले की साहित्य मिळते. नैतिकता ही कलानुभवाच्या बाहेरची गोष्ट नसून कलाविष्कारात ती अपरिहार्यपणे अनुस्यूत असते असा स्पष्ट दृष्टिकोन मग स्वीकारता येतो. नेमाडे यांनी असा दृष्टिकोन स्वीकारलेला आहे. नैतिकता हे नेमाडे यांच्या साहित्य विवेचननातील- विशेषतः त्यांनी केलेल्या कादंबरीसमीक्षेतील एक महत्त्वाचे तत्त्व आहे. साहित्यकृतीतून वास्तवाचे आकलन करणारी लेखकाची मूल्यदृष्टी किंवा मूल्यविवेक अशा अर्थाने नेमाडे नैतिकता ही संज्ञा वापरत. नैतिकता हे कलाकृतीच्या संरचनेशी निगडित असणारे तत्त्व आहे, एवढेच नव्हे तर कलाकृतीच्या मूल्यमापनाचा तो एक प्रमुख निकष आहे असे नेमाडे मानतात. मात्र नीतिबोधाचे पाठ देणाऱ्या प्रस्थापित ढोबळ नैतिकपेक्षा साहित्यकृतीतील तरल व व लवचिक नैतिकता वेगळ्या प्रकारची असते असे ते आवर्जून सांगतात. सार्वत्रिकता नीतिनियम अशा अर्थाने नेमाडे यांना नैतिकता अभिप्रेत नसून प्रत्येक स्थिती(सिच्युएशन) नुसार आणि व्यक्तीनुसार नैतिक आकलन भिन्नभिन्न असू शकते असे नेमाडे यांना अभिप्रेत आहे. म्हणूनच व्यक्तिगत मूल्यविवेक असा शद्बप्रयोग ते करतात. कला आणि नीती यांची सांगड घालणारा विचार आधुनिक मराठी समीक्षेच्या प्रारंभकाळापासून मांडला गेलेला आहे. परंतु एक सौंदर्यतत्त्व म्हणून नैतिकता साहित्यकृतीमध्ये अंगभूतच असते अशी स्पष्ट भूमिका मात्र घेतली गेलेली दिसत नाही. कला आणि नीति या विषयावर अतिशय व्यवस्थित विवेचन करणारे रा.भा. पाटणकरही कलाकृतीची नैतिक बाजू निरपवादपणे महत्त्वाची असते असा निष्कर्ष निःसंदिग्धपणे काढू शकलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर साहित्यातील नैतिकतेविषयी नेमाडे यानी मांडलेली भूमिका पारंपरिक नीतिवादी समीक्षेपेक्षा वेगळ्या प्रकारची आहे, हे दिसून येते. शरद पाटील यांनी नैतिकता ही संकल्पना स्वतंत्रपणे वापरलेली नसली तरी तेही एका सम्यक् परिवर्तनवादी भूमिकेतून साहित्याकडे पाहतात. जातवर्गस्त्रीदास्यंतक समाजक्रांतीच्या प्रबोधनाची साहित्य व कला ही सर्वात प्रभावी हत्यारे असून सम्यक समाजक्रांती हेच साहित्याचे उद्दिष्ट असले पाहिजे असे पाटील यांना वाटते. यावरून साहित्यातून विशिष्ट मूल्यांचा आविष्कार व्हावा अशी अपेक्षाच ते व्यक्त करतात असे दिसते.

साहित्य हे भाषेच्या माध्यमातून आविष्कृत होत असल्याने साहित्याच्या सौंदर्यविषयक चर्चेत भाषेचा विचारही महत्त्वाचा ठरतो. प्रस्थापित सौंदर्यशास्त्राच्या विरोधात उभे राहू

पहाणाऱ्या पर्यायी सौंदर्यशास्त्राला वाङ्मयीन भाषेच्या संदर्भातही काही वेगळी भूमिका घेणे आवश्यक ठरते. वाङ्मयीन भाषेबद्दल अशी वेगळी भूमिका भालचंद्र नेमाडे यांच्या लेखनात आपणास सापडते. त्यांनी साहित्याच्या भाषेबद्दल मांडलेली भूमिका भाषासौंदर्याबद्दलच्या रूढ कल्पनांच्या मर्यादा स्पष्ट करणारी आहे. साहित्याच्या भाषेबद्दलची आपली भूमिका मांडताना नेमाडे म्हणतात ''वास्तवाचे आकलन भाषेच्या द्वारेच होते. कृत्रिम भाषेमुळे आशय व रूप यांची परिमाणे बिघडतात---- ज्या समाजात मोठमोठ्या समूहांची, जातिजमातींची व प्रदेशाची भाषा साहित्यात येण्यापासून परावृत्त केली जाते त्या समाजात पर्यायाने विविध समूहांची जीवनाकडे पहाण्याची दृष्टी व पद्धत, एवढेच नव्हे तर त्यांच्या सौंदर्यकल्पना आणि मूल्येही साहित्यव्यवहारातून बहिष्कृत केली जातात. एक प्रकारची अल्पसत्ताक वाङ्मयीन अभिरुची रूढ होते.'' (टीकास्वयंवर, पृ. १९४) नेमाडे यांची ही भूमिका वाङ्मयीन भाषेबाबतच्या प्रस्थापित अभिरुचीला छेद देणारी आहे. म्हणूनच प्रस्थापित समीक्षेने भाषाप्रभू म्हणून गौरवलेल्या लेखकांचे आपल्या भूमिकेनुसार नेमाडे यांनी केलेले पुनर्मूल्यमापन धक्कादायक ठरणारे झालेले आहे. अलिकडे भाषाशास्त्रीय किंवा शैलीशास्त्रीय अंगाने मराठीत लिहिली जाणारी समीक्षा पाहिली तर तिच्यावर संरचनावादी भूमिकेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. नेमाडे आधुनिक भाषाशास्त्र व शैलीशास्त्राचे अभ्यासक असले तरी एका मर्यादेपलिकडे ते संरचनावादाचा स्वीकार करू शकत नाहीत हे त्यांच्या एकूण वाङ्मयीन भूमिकेशी सुसंगतच आहे, असे म्हणावे लागते.

नेमाडे आणि शरद पाटील यांनी केलेल्या साहित्यविवेचनातील आणखी एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे देशीयता हे होय. पाटील आणि नेमाडे यांनी मूल्यांविषयी जी सापेक्षतावादी भूमिका स्वीकारलेली आहे, तिची परिणती देशीयतेच्या पुरस्कारात होणे अपरिहार्यच आहे. शरद पाटील यांनी देशीयता या संकल्पनेचा स्वतंत्रपणे विचार केलेला नसला तरी त्यांच्या एकूण लेखनातून देशीय दृष्टिकोन प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे व्यक्त झालेला आहे. नेमाडे यांनी मात्र देशीयता या संकल्पनेची सविस्तर तात्त्विक चर्चा केलेली असून साहित्याच्या जडणघडणीत देशीयतेचे हे तत्त्व किती प्रमाणात प्रस्थापित करता येते याचा विचार केलेला आहे. साहित्य आणि तद्विषयक सौंदर्यव्यवस्था ह्या विशिष्ट समाजाच्या सामाजिक- सांस्कृतिक आवरणानुसार नैसर्गिकपणे विकसित होत असतात. पण हे सामाजिक- सांस्कृतिक वास्तव लक्षात न घेता परकीय मूल्यांची आंधळेपणाने उसनवारी केली तर ती आपल्या सांस्कृतिक ऱ्हासालाच कारणीभूत होते. अशा एकतर्फी उसनवारीने साहित्यादि कलाव्यवहारात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या त्या भूमीची चिन्हव्यवस्था साहित्यादि व्यवहारातून प्रकट व्हावी लागते. ती न झाल्यास साहित्याचा गुणवत्तेच्या दृष्टीने ऱ्हास होतो. म्हणून उसनवारीचा व्यवहार कोणत्याही संस्कृतीच्या विकासासाठी आवश्यक असला तरी ही उसनवारी आपल्या देशी प्रमाणकांच्या आधारावरच झाली पाहिजे. अशी नेमाडे यांची देशीयतेबद्दलची भूमिका थोडक्यात सांगता येईल. वसाहत काळातील आंग्ल संस्कृतीच्या संपर्काचे कोणते इष्ट आणि अनिष्ट परिणाम आपल्या साहित्यव्यवहारावर झालेले आहेत याचे विवेचन जसे नेमाडे यांनी केलेले आहे;

तसेच साहित्य आणि सौंदर्य यांच्या देशी प्रमाणकांचा शोधही त्यांनी घेतलेला आहे. आपल्या वास्तवाचे भान न ठेवता परकीय मूल्ये आंधळेपणाने स्वीकारणे आणि एका समाजगटाने बहुसंख्यांक समाजावर आपली मूल्ये लादत राहणे याला नेमाडे यांचा विरोध आहे.

पाश्चात्य वसाहतवादाच्या प्रभावाचा विचार करताना, हिंदुस्थानातील विविध वंशसमूहांनी कित्येक शतके विकसित केलेल्या समृद्ध अशा सौंदर्यशास्त्रीय व्यवस्था इंग्रजीच्या सौंदर्यशास्त्राने कशा भ्रष्ट करून टाकलेल्या आहेत हे नेमाडे यांनी दाखवून दिलेले आहे. कलांमधील व्यवस्थांचे आणि परंपरेचे सातत्य पाश्चिमात्य सौंदर्यशास्त्रीय आदर्शांनी तोडलेले आहे असे त्यांना वाटते. स्वायत्तता व विकेंद्रीकरण ही भारतीय दृष्टीला पायाभूत असणारी तत्त्वे असून मूठभर लोकांचे आदर्श विशाल जनसमूहांवर लादणाऱ्या वसाहतावादांमुळे या पायाभूत तत्त्वांवरच आघात झालेला आहे असे नेमाडे यांना वाटते. 'व्यक्ति आणि समाज यांच्या संबंधाचे परदेशी मूल्यांनी चुकीचे सामान्यीकरण केल्यानें मराठी साहित्यातल्या वास्तवाच्या चित्रणाच्या सर्व दिशा बिघडून गेल्या' असेही त्यांनी दाखवून दिलेले आहे. (टी.स्व., पृ.७४). आंग्ल संपर्कामुळे मराठी समाजाचे जे आधुनिकीकरण झाले त्याची मर्यादा दाखविताना नेमाडे लिहतात, ''१८१८ पासून आजपर्यंत ही मानसिक गुलामगिरी आपल्या आधुनिकीकरणातला अविभाज्य घटक आहे. आणखी एक कारण म्हणजे आधुनिक संस्कृतीची मूल्ये आपल्या समाजात प्रायः पुरोहित- वर्गवर्चस्ववादी ब्राह्मणांनी आत्मसात केल्यामुळे आणि जवळजवळ सगळे लेखक ह्याच वर्गातले असल्यामुळे आपले आधुनिकीकरण आंग्लब्राह्मणी- गुलामी पद्धतीचे आजपर्यंत चालू आहे.'' (टीकास्वयंवर, पृ. ७१)

नेमाडे आणि पाटील यांनी स्वीकारलेला देशीवाद या आंग्ल-ब्राह्मणी वर्चस्वाने लादलेल्या गुलामीला विरोध करणारा आहे. सौंदर्यविषयक देशी प्रमाणकांचा आग्रह धरतांना या दोघांनीही स्वीकारलेली भूमिका वासाहतिक काळातील परकीय प्रभावालाच केवळ विरोध करते असे नसून एतद्देशीय उच्चवर्णीय परंपरेच्या एकतर्फी प्रभावाच्याही ती विरोधात उभी राहते, म्हणूनच 'खरा संघर्ष एका समूहाचा दुसऱ्याशी, एका जातीचा दुसरीशी नसून एका मूलसंस्कृतीशी पोटसंस्कृतीचा आहे' असे नेमाडे म्हणतात. शरद पाटील यांनी आपल्या विवेचनाची सगळी मांडणीच ब्राह्मणी मूल्यसंकल्पना आणि अब्राह्मणी विचारपरंपरा यांच्यातील संघर्ष गृहीत धरूनच केलेली असून ब्राह्मणी मूल्यसंकल्पना हया विषमेतेला पोषक व वर्चस्ववादी कशा आहेत हे दाखवून दिलेले आहे. देशीयतेचा विचार अशा प्रकारे एकवर्गीय प्रभावाला विरोध करून विविध समूहांची स्वायत्तता आणि विकेंद्रीकरण या तत्त्वांचा पुरस्कार करतो. याचा अर्थ असा की उच्चवर्णीय मूल्यव्यवस्थेतून उभ्या राहिलेल्या प्रस्थापित सौंदर्यशास्त्राला पर्यायी असे सौंदर्यशास्त्र उभे करायचे असेल तर देशीयतेच्या तत्त्वाचा स्वीकार केल्याशिवाय ते करता येणार नाही, असे म्हणावे लागेल.

भालचंद्र नेमाडे आणि शरद पाटील यांनी केलेल्या सहित्यमीमांसेतून काही समान सूत्रे हाती लागतात त्यांचा आतापर्यंत विचार केला. दोघांनी केलेल्या विवेचनात काही महत्त्वपूर्ण भेदही ओहत. दोघांच्या विचारात आणि विचार मांडण्याच्या पद्धतीत काही भिन्नता आहे.

पण दोघांतील भिन्नतेचा विचार इथे प्रस्तुत नाही. दोघांच्या लेखनात जी समान सूत्रे आढळतात ती मराठीतल्या साहित्यशास्त्रीय/ सौंदर्यशास्त्रीय मीमांसेला काही नवी दिशा देणारी ओहत. सौंदर्यमूल्यांची सार्वत्रिकता नाकारणे, साहित्यव्यवहाराचा सामाजिक -सांस्कृतिक संदर्भात विचार करून कलावादी – रूपवादी भूमिकेला विरोध करणे, सौंदर्य कल्पना आणि सामाजिक-सांस्कृतिक मूल्यकल्पनांतील अंतर नाहीसे करणे, भाषेचा विचार सामाजिक भूमिकेतून करणे आणि देशी प्रमाणकांचा आधार घेणे या सूत्रांतूनच मराठीतले पर्यायी सौंदर्यशास्त्र उभे राहू शकेल असे वाटते.

वासुदेव सावंत

मराठी विभाग,
गोवा विद्यापीठ,
गोवा ४०३२०३.

निमित्त प्रकाशनाची वैचारिक पुस्तके

- **नीतिबंध आणि नीतिभंग**
  प्रा. डॉ. सुभाषचंद्र भेलके
  पृष्ठे ६८, किंमत २५ रु.
- **भारतीय स्त्री : संकल्पना आणि प्रतिमा**
  प्रा. डॉ. मीना केळकर
  पृष्ठे ९५, किंमत २५ रू.
- **तर्कशास्त्र**
  प्रा. डॉ. हेमा मोरे
  अकरावीचे S.S.C. बोर्डाचे मान्यताप्राप्त पाठ्यपुस्तक
  पृष्ठे १५६, किंमत रु.४१.५०
- **Dialogues of Reasonableness**
  Dr. Deepti Gangavane
  Pages 144, Price Rs. 200/-

निमित्त प्रकाशन
४२८ मंगळवार पेठ, पुणे - ४११ ०११